बोलगार्ड २ मध्ये दोन जनुके आहे, क्राय १ ए सी व क्राय २ ए बी ह्या दुहेरी जनुकामुळे प्राथमिक बोंड अळ्या जसे की अमेरिकन बोंडअळी, टिपकेदार बोंडअळी (फरिआस), गुलाबी बोंडअळी (पेक्टिनोफोरा), तसेच दुय्यम लेपिडोप्टेरन्स जसे तंबाखु पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा) सुध्दा नियंत्रित राहते. मात्र हे तंत्रज्ञान रसशोषक किड्यापासुन संरक्षण करीत नाही.

कृषि व शेतकारी कल्याण मंत्रालय, सहकारी, कृषि व शेतकारी कल्याण विभाग भारत सरकार नुसार गॅझेट नोटीफिकेशन क्र. एस.ओ. ४२१५ (ई) दिनांक २७.१२.२०१६ प्रमाणे प्रत्येक पॅकेट मधिल बीटी बियाणे हे ५% गैर बीटी बियाणे मिश्रीत आहे.

**रेफ्युजीया इन बॅग** (RIB) **किटकांची प्रतिकार क्षमता व्यवस्थापन संकल्पना :** बीटी कपाशीच्या बियाण्याच्या पॅकेट मध्ये ५% गैर बीटी बियाणे मिश्रीत करणे याला RIB संकल्पना म्हणतात. हे गैर बीटी बियाणे पेरणीनंतर कालावधी करीता व तंतुधागा गुणवत्तेत बीटी बियाण्यांसारखेच असते. RIB मुळे अल्प उत्पादन तोटा अपेक्षित आहे परंतु किटकांमध्ये बीटी विरुद्ध निर्माण होणरी प्रतिकार क्षमता टळुन हे तंत्रज्ञान जास्त काळासाठी प्रभावी ठरु शकते.

**बोलगार्ड २ चे महत्व :**

बोंडअळ्याविरूध्द अत्यंत प्रभावी, ईतर बीटी पर्यायापेक्षा कमी रासायनीक फवारणीची गरज. बोलगार्ड २ लागवडीपासुन जास्तीत जास्त फायदे मिळविण्यासाठ पुढील मार्गदर्शक बाबींचा अवलंब करावा.

**जमीन तयार करणे :**

शेतीच्या सफाईसाठी आधीच्या पीकांचा कचरा गोळा करून जाळून टाकावा, जमीनीव्दारे पसरणारे रोग, किड आणि तण यांचे प्रमाण कमी करण्यासाठी दोनदा खोल उन्हाळी नांगरणी करून उभी आडवी वखरणी करावी.

**शेण खत :** हेक्टरी ५ ते ६ टन शेणखत पेरणीच्या ३-४ आठवडे आधी सारख्या प्रमाणात पसरवुन द्यावे.

**रासायनीक खते :** माती परिक्षणानुसार किंवा स्थानिक प्रचलित पध्दतीप्रमाणे रासायनीक खतांची मात्रा देण्यात यावी.

**अंतर :** आपल्या भागातील प्रचलित पध्दतीप्रमाणे दोन झाडांमधील अंतर ठेवावे.

**पेरणीची पध्दत :** झाडांची योग्य संख्या राखण्यासाठी एकाजागी दोन बियांची लागवड करावी. उगवणीनंतर जोमदार वाढलेले झाड ठेवुन दुसरे कमकुवत झाड उपटुन टाकावे.

**खाडे भरणे :** झाडांची संख्या योग्य ठेवण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे एका आठवड्याच्या आंत खाडे भरावे.

आंतर मशागत आणि तण नियंत्रण : आवश्यकते नुसार निंदणी व कोळपणी करावी. त्यामुळे जमीनीमध्ये हवा खेळती राहुन ओलावा टिकून राहण्यास मदत होते. शिफारशीनुसार तणनाशकाचा वापर करावा.

**सिंचन :** उगवण, रोपट्याची वाढ, पाती व फुल लागण्याची अवस्था तसेच बोंड परिपक्व व विकास अवस्थामध्ये पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता ध्यावी. कापुस या पीकावर पाणी साचल्याने त्वरित परिणाम होतो. त्यामुळे शेतामधून पाणी निचरा होईल याची काळजी घ्यावी.

**एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन :** खालीलप्रमाणे एकात्मिक किड व रोग व्यवस्थापनचा वापर करावा.

१. पुर्वी सांगितल्याप्रमाणे उन्हाळ्यात नांगरणी व शेतीची साफसफाई करावी.

२. **बीज प्रक्रिया :** रसशोषक किटकांच्या नियंत्रणासाठी बोलगार्ड २ बियाणांवर बीज प्रक्रिया उपाय आधीच केलेला आहे.

३. **रसशोषक किटकांचे नियंत्रण :** पीक वाढीच्या कोणत्याही अवस्थेत जर रसशेषक किटकांच्या संसर्गाने आर्थिक नुकसानाची पातळी ओलांडली तर नियंत्रणासाठी शिफारशी प्रमाणे किटकनाशकाची फवारणी करावी.

| **किड** | **आर्थिक नुकसानीची पातळी** |
|---|---|
| तुडतूडे | पानागणिक छोट्या किंवा प्रौढ अवस्थेतील १-२ किटक |
| पांढरी माशी | पानागणिक छोट्या किंवा प्रौढ अवस्थेतील ८-१० किटक |
| मावा | १०% रोपांवर प्रदुर्भाव |
| फुलकिडे | पानागणिक छोट्या किंवा प्रौढ अवस्थेतील १०-२० किटक |
| कोळी | पानागणिक छोट्या किंवा प्रौढ अवस्थेतील १० किटक |

४. **बोंडअळी व्यवस्थापन :** आर्थिक नुकसान पातळीवर आधारित फवारणी जर बोंडअळीच्या प्रादुर्भावाचे प्रमाण आर्थिक नुकसान पातळी पेक्षा वाढले तर बोंडअळी व्यवस्थापनाच्या फवारणीची आवश्यकता आहे. प्रादुर्भावाचे प्रमाण आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडते किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणयासाठी आठवड्यातुन एकदा बोलगार्ड २ चे शेत खालील प्रमाणे तपासा :

I. **अमेरिकन बोंडअळी (हिरवी बोंडअळी) साठी :** एका एकराच्या विविध भागातील २० झाडे निवडा, जर २ किंवा अधिक अमेरिकन बोंडअळी (२० झाडामधुन) किंवा या निवडलेल्या झाडांच्या बोंडापैकी १०% बोंड अमेरिकन बोंडअळीच्या नुकसानाने ग्रस्त दिसली तर समजावे की आर्थिक नुकसानीची पातळी गाठली आहे.

II. **गुलाबी बोंडअळीसाठी :** एका एकराच्या विविध भागातुन २० फुले किंवा २० बोंडे निवडा आणि त्यातील गुलाबी बोंडअळीची संख्या मोजा, जर २ किंवा अधिक गुलाबी बोंडअळ्या निघाल्या तर समजावे की आर्थिक नुकसानीची सीमा ओलांडली आहे. आर्थिक नुकसानीची पातळी कामगंध सापळ्याचा वापर करून देखिल ठरविता येते (प्रती एकर ३ कामगंध सापळे) जर दर सापळ्यात सलग ३ रात्री ८ किंवा जास्त गुलाबी बोंडअळीची फुलपाखर आढळली तर आर्थिक नुकसान पातळी ओलांडली समजावे. आपल्या भागातील कृषी विद्यापाठ किंवा कृषी विभागाने सुचविलेल्या किटकनाशकाची फवारणी करावी.

**नोंद :** बीटी बियाण्याच्या नियंत्रणात नसलेल्या इतर किटक लष्करी अळी, स्पोडोप्टेरा, स्टेम, विवील इत्यादीसाठी शिफारसयुक्त किटक नाशकांचा वापर करावा.

५. बोलगार्ड च्या मशगतीसाठी शिफारस केलेल्या इतर आय.पी.एम. पध्दती वापरता येतील त्यात फेरोमोन सापळा / प्रकाश सापळे / पक्षांना बसण्यासाठी जागा, नैसर्गिक शत्रुंचा वापर, जैविक किटकनाशके (एच.ए.एन.पी.व्ही., कडूलिंब) इत्यादींचा सामावेश आहे.

६. एकाच वर्गातील किटकनाशकाचा वापर वारंवार करणे टाळावे.

७. पीकांची वेळेवर विल्हेवाट करावी. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास फरदड घेणे टाळावे. फरदड घेतल्यास गुलाबी बोंडअळीचा पुढील हंगामात प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते.

८. **शेतीची साफसफाई :** गुलाबी बोंडअळीचे कोष अर्धवट उमललेल्या बोंडामध्ये व न उमललेल्या बोंडामध्ये असतात ते गोळा करून त्याचा नायनाट करावा.

९. **खोलवर नांगरणी :** बोंडअळीच्या नायनाटासाठी पीक काढणीनंतर खोलवर नांगरणी करावी जेणे करुन गुलाबी बोंडअळीचे प्रभावी नियंत्रण करता येईल.

**कपाशीवरील प्रादुर्भाव करणाऱ्या रोगाचे व्यवस्थापन :** अल्टरनॅरीया पानावरील टिपके, दहीया, लिफ ब्लाईट आणि बोंड सडणे या रोगांच्या नियंत्रणासाठी गरजेनुसार शिफारशीकृत पध्दतीचा वापर करावा.

**कपाशीच्या पीकांवर प्रामुख्याने आढळणारे रोग :**

**करपा / अल्टरनॅरीया लिफ ब्लाईट :** हा रोग पानावरील लहान फिक्कट तपकिरी रंगाच्या वाटोळ्या ठिपक्यांच्या स्वरुपात सुरवातीला दिसु शकतो. हळुहळु हे ठिपके मोठे होत जातात व केंद्राभोवती खाचा पाडुन मोठे होत जातात.

**करपा / सर्कोस्पोरा लिफ स्पॉट :** ह्या रोगाच्या लक्षणाची सुरवात पानावरील लालसर ठिपक्याच्या स्वरुपात होते, हळुहळु ह्याचा व्यास वाढत जावुन अखेरीस लाल रंगाचा किनारा व त्यात मृत झालेल्या पांढ-या ते हलक्या तपकिरी रंगाच्या मृत पेशींचा मध्यबिंदु उरतो.

**दहिया / ग्रे मिल्ड्यू :** पानावरील अनियमित, कोनीक पिवळट हिरव्या रंगाच्या ठिपक्यांनी दहिया रोगाच्या लक्षणाची सुरवात दिसू लगते. हे चट्टे हळुहळु पिवळसर ते लालसर तपकिरी रंगचे होतात आणि पांढ-या बुरशीची वाढ मुख्यातः खालच्या पृष्ठभागावर व कधीकधी वरच्या बाजुला दिसू लागते.

**बॅक्टेरीयल ब्लाईट :** ह्या रोगाची लक्षणे म्हणजे पानावरील कोनीक ठिपके, काळीशिर किंवा शिरांवर ठिपके, खोड व फांद्यावरील ठिपके व बोंडावर तेलकट चट्टे दिसतात. कालांतराने तपकिरी रंगापासुन ते काळ्यारंगापर्यंत सुध्दा चट्टे जातात.

**व्यवस्थापन :**

१. पुरेशे पोषण व योग्य सिंचन वयवस्थापन यामुळे पाने रोगाला लवकर बळी पडणार नाहीत व पीकांचे संरक्षण होईल. ज्या शेतांना मर रोग येण्याचा पूर्व ईतिहास आहे त्या शेतात कापसाचे पीक घेणे टाळावे.

२. पुरेशे शेणखत देण्यावर भर द्यावा.

३. लागवड करतांना दोन ओळीमध्ये जास्त अंतर ठेवा किंवा पट्टापध्दतीने लागवड करा त्यामुळे झाडामध्ये दमट वातावरण राहणार नाही.

४. प्रद्याभावित /रोगट पाने काढून टाकणे व ती नष्ट करणे यामुळे पानांवरील ठिपक्यांची तीव्रता कमी होईल.

५. कॉपर ऑक्सीक्लोराईड किंवा २ ते २.५ ग्राम वेटेबल सल्फर + १ ते १.५ ग्राम बाविस्टीन प्रति लीटर ची फवारणी बुरशीच्या ठिपक्यांच्या नियंत्रणासाठी करावी. बॅक्टेरियल लीफ ब्लाईट च्या नियंत्रणसाठी किंवा २ ते २.५ ग्राम कॉपर ऑक्सीक्लोराईड + ०.१ ग्राम बाविस्टीन + ०.१ ग्राम स्ट्रेप्टोसायाक्लिन ची फवरणी करावी.

६. बुरशी व बॅक्टेरियल रोगच्या संमिश्र प्रादुर्भावांच नियंत्रण २ ते २.५ ग्राम कॉपर ऑक्सीक्लोराईड + १.५ ग्राम बाविस्टीन + ०.१ ग्राम स्ट्रेप्टोसायाक्लिन प्रति लीटर च्या फवारणीने होऊ शकते.

७. रोगाची प्रथमिक लक्षणं दिसताच फवारणी सुरु करावी व १५-२० दिवसांच्या अंतराने २-३ वेळा करावी.

**कपाशी पीकावरील मर रोगचे व्यवस्थापन :** हलक्या व मध्यम प्रकारच्या जमीनीमध्ये पाण्याच्या ताणावपूर्ण परिस्थितीमध्ये ह्या रोगाची लक्षणे अधिक असते. फ्युझेरियम ऑक्सीस्पोरम, रायझोक्टानिया सोलानी व रायझोक्टानिया बॅटाटीकोला हे प्रमुख जैविक घटक आहेत. जमीनीमध्ये पाणी साचल्यामुळे मर रोग आढळुन आल्यास तात्काळ पाण्याचा निचरा करावा व आंतरप्रवाही बुरशीनाशकाचा वापर जमीनमध्ये करावा.

मर रोग पीकाच्या वाढीच्या कोणत्याही अवस्थेत येवू शकते, मोठ्या झाडांवर फुले येण्याच्या किंवा बोंडे धरण्याच्या वेळी ही लक्षणे ठळकपणे दिसुन येतात लागण झालेली झाडे निस्तेज मलुल दिसतात व पाने रंगाने फिक्कट हिरवी पिवळसर होता व हळुहळु झाड वाळते. पायापासुन वरच्या दिशेने खोडाचा रंग काही प्रमाणात कमी होणे, वाहीन्या किंवा शिरांचा रंग उडणे आणि मुळे टोकाकडुन सडणे ह्या गोष्टी झाडे मलूल पडण्याच्या अवस्थेमध्ये आढळून येतात. ह्या रोगाच्या शेवटच्या अअवस्थेत खोडापासून वर रंग थोड्याप्रमाणात बदलतो. खोडाच्या आतील वाहिन्यांचा रंग फिक्कट होतो व तसेच मुळे सडतात.

**व्यवस्थापन :**

१. हलक्या मातीत जर पीक घेतले असेल तर वेळेवर पाणीपुरवठा केल्यास पीक वाळुन जाण्यापासुन वाचविता येईल.

२. ज्या शेतांना मर रोग येण्याचा पूर्व ईतिहास आहे त्या शेतात कापसाचे पीक घेणे टाळावे.

३. शेणखत देण्यावर भर द्यावा.

४. पीक वाढीच्या अवस्थेत नायट्रोफॉस्क ३ ग्राम /लीटर दराने फवारावे व फुले येण्याच्या वेळी नायट्रोफस्क ३ ग्राम /लीटर + प्लॅनोफिक्स ०.३ मि.लि. /लीटर दराने फवारावे.

**प्रौढ झाडांवरील मर रोगाचे नियंत्रण :**

१. पेरणीनंतर ५०-६० दिवसांनी बॅविस्टीन (कार्बेनडाझिम) + कॉन्टाफ (हेक्साकोनॅझोल) किंवा शीथमार (व्हॅलिडामाइसिन) ३ ग्राम /लीटर (०.५-१ लि. /झाड) या दराने झाडाच्या बुडाशी टाकावे.

२. मर रोगाची लक्षमे दिसुन येताच ताबडतोब पाण्याचा निचरा करावा.

**वेचणी :** प्रचलित वेचणी पध्दतीने बोलगार्ड २ ची वेचणी करावी.

**तळटीप :** ह्या पत्रकामधील माहीती ही विविध प्रकाशनाच्या आधारे दिली आहे. पीकांचे उत्पादन हे जमिनीचा प्रकार, हवामान, पीक व्यवस्थापन, रोग व किटकांचा प्रादुर्भाव इत्यादी बाबींवर अवलंबुन असते. पीक व्यवस्थापन हे आमच्या नियंत्रणाबाहेर आहे म्हणून शेतकरी हा पुर्णतः पीक उत्पादनास जबाबदार असेल. तथापी शेतक-यांना भरपूर उत्पादनासाठी पेरणी योग्य वेळी व येग्य पीक व्यवस्थापन करण्याची सुचना देण्यात येते. ह्या सर्वोपरी कुठल्याही पीक नुकसानी करीता कंपनी जबाबदार राहणार नाही.

## कापुस : KCH-36 बीजी २

| | विदर्भ | मराठवाडा | पश्चिम महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| बाब | तपशील | तपशील | तपशील |
| पिकाच्या वाणास योग्य कृषि हवामान विभाग | साधारणत : ६० ते ७५ सें.मि. पाऊस व कमीत कमी १५ अंश सें. तापमानात पीक चांगले उगवते आणि पीक चांगले येते. पीकाच्या जोमदार वाढीसाठी २१ ते २७ अंश सें. व फुलपाती, फलधारणायासाठी तापमान २७ ते ३० अंश सें. असावे. | कृषि विद्यापीठ यांच्या माहिती प्रमाणे नियोजन करावे. | पीक उगवणीस १८ ते २० अंश सें. आणि पीकाच्या जोमदार वाढीस २७ ते ३० अंश सें. व फुलपाती, फलधारणायासाठी १५ ते ३५ अंश सें. तापमान असावे. आद्रता ७५ पेक्षा कमी लागते. |
| जमीनीची निवड व जमिनीची मशागत | मध्यम ते भारी, पाण्याचा निचरा होणारी, ६ ते ८.५ सामुची जमीन निवडावी. प्रति वर्षी (बागायतिस) २० ते २५ गाड्या चांगले शेणखत व १ नांगरट आणी कोरडवाहुस १२ ते १५ गाड्या चांगले शेणखत व तीन वर्षांतून एक नांगरट, वखरपाळ्या कराव्या. | कोरडवाहुस : मध्यम ते भारी खोल आणि बागायतिस मध्यम ते खोल पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. १ खोल नांगरट व २ ते ३ वखराचा पाळ्या कराव्या. | मध्यमकाळी, पाण्याचा निचरा होणारी व ६ ते ८.५ सामुची जमीन निवडावी. व २० ते २५ गाड्या शेणखत/हे., १ नांगरट व २ ते ३ वखराचा पाळ्या कराव्या. |
| बीज प्रक्रि या- वेळ/ रासायनिक औषधे | थायरम २ ग्रॅ.+इमिडाक्लोप्राइड ९ मि.ली./ किलो बीयाण्यास. | थायरम २ ग्रॅ.+इमिडाक्लोप्राइड ९ मि.ली./ किलो बीयाण्यास. | थायरम २ ग्रॅ.+इमिडाक्लोप्राइड ९ मि.ली./ किलो बीयाण्यास. |
| पेरणीची वेळ | बागायतिस : २० ते ३० मे, कोरडवाहुस १५ ते ३० जून, सुमारे ७५ ते १०० मी.मी. पाऊस झाल्यास ताबडतोब पेरणी करावी. | बागायतिस : मे चा शेवटचा आठवडा ते ७ जून. कोरडवाहुस : योग्य पाऊस झाल्यावर त्वरीत पेरणी करावी (७ जुलै पर्यंत). | जून चा पहिला पंधरवाडा |
| पेरणीकरिता लागणारे बियाणे - पेरणीची पध्दत - (दोन ओळीतील व दोन रोपांमध्ये अंतर ठेऊन/ पेरणी) | बियाणे बागायतिस : २ ते २.५ कि./हे., पेरणीचे अंतर १२०×९० सें.मी. व सरीवरंबा पध्दत वापरावी कोरडवाहुसाठी ३.५ ते ४ कि./हे., ९०×६० सें.मी. वर टोकुन पेरणी करावी. | बियाणे बागायतिस : संकरीत वाण - २.५ ते ३ कि./हे. व कोरडवाहुस ३ ते ४ कि./हे. आणि पेरणीचे अंतर (भारी जमीनीस) ९०×६० सें.मी. व मध्यम जमीनीस ८०×६० सें.मी. | बियाणे २.५ ते ३ कि./हे., पेरणीचे अंतर मध्यम प्रकारचा जमीनीस ८०×६० सें.मी. व काळ्या जमीनीस ८०×८० सें.मी. |
| रसायनिक खत - मात्रा व खत देण्याचा कालावधी व वेळ | बागायतिस : ४०:६०:६० कि./हे., ४० कि./हे. नत्र (३० दिवस), ४० कि./हे. नत्र (६० दिवस) व कोरडवाहुस : ३०:३०:३० कि./हे., ३० कि./हे. नत्र (३० दिवसांनी), २% युरिया पीक फुलावर असतांना, २% डीएपी बोंडे भरण्याच्या अवस्थेत फवारणी केल्यास १३.६% कृषी विद्यापीठाच्या माहीतीनुसार | पेरतांना बागायतिस : ३०:७५:७५ कि./हे., आणी ६० कि./हे. नत्र पेरणीनंतर (३० दिवस) व ६० कि./हे. नत्र (६० दिवस). पेरतांना कोरडवाहुस : ६०:६०:६० कि./हे. आणि ६० कि./हे. नत्र पेरणीनंतर (४५ दिवस) | पेरणीच्यावेळी २५:६५:६५ कि./हे., आणि ५० कि./हे. नत्र पेरणीनंतर (३० दिवस) व ५० कि./हे. नत्र (६० दिवसांनी). |
| तण नियंत्रण - रासायनिक औषध - मात्रा व वेळ | अंतर मशागत, निंदणी, डवरनी करुन पीक तणविरहित ठेवावे (कृषि विद्यापीठ यांच्या माहिति प्रमाणे नियोजन करावे). | पेंडीमिथॅलिन २.५ कि./हे., किंवा ड्युरॉन ६२५ ग्रॅ/हे. +१००० ली. पाण्यातून (पेरणीनंतर व उगवणयापूर्वी) फवारावे. | पेंडीमिथॅलिन (स्टम्प) किंवा फल्युक्लोरॅलीन (बासालीन) ०.७५ ते १ कि./हे.+ ५०० ली. पाण्यातून व ड्युरॉन १ कि./हे.+ ५०० ली. पाण्यातून फवारावे. |
| रोग व किड नियंत्रण - रासायनिक औषध - मात्रा व वेळ | कृषि विद्यापीठ यांच्या माहिति प्रमाणे नियोजन करावे. | कृषि विद्यापीठ यांच्या माहिति प्रमाणे नियोजन करावे. | कृषि विद्यापीठ यांच्या माहिति प्रमाणे नियोजन करावे. |
| पाणी देण्याचे वेळापत्रक | पीक फुलावर व बोंडे भरण्याची अवस्था असतांना (१० ते १२ दिवसाच्या अंतराने) २ ते ३ पाणी द्यावे. बोंडे फुटणे सुरु असतांना पाणी देऊ नये. | (गरजे प्रमाणे) पीक फुलावर, कळयात असतांना, बोंडे भरणे या अवस्थेत ४ ते ५ पाणी द्यावे. | कोरडवाहुस : पेरणी नंतर पाते अवस्था (३० ते ४० दिवस), बोंडधरणे (६० दिवस) व ९० ते १०० दिवसांनी परीपक्व होणे. |
| पिक काढणीचा तपशील | कापसाची बोंडे चांगली फुटल्यावर चांगला कापुस, पिवळसर, किडका, कवडीयुक्त, भिजलेला, कापूस वेगळा अश्या वेचण्या कराव्यात. पालापाचुळा चिकटू देऊ नये. | कापसाची बोंडे चांगली फुटल्यावर चांगला कापुस, पिवळसर, किडका, कवडीयुक्त, भिजलेला, कापूस वेगळा अश्या वेचण्या कराव्यात. पालापाचुळा चिकटू देऊ नये. | ३० ते ३५% कापसाची बोंडे फुटल्यावर पहिली वेचणी व त्यानंतर साधारणतः १५ ते २० दिवसाच्या अंतराने वेचण्या कराव्या. |
| वाणाचे गुणवत्ता विषयक गुणधर्म | • उंच, झाडांची सरळ व उभाट वाढ<br>• कमी अंतर ठेवून लावण्यास योग्य | • उंच, झाडांची सरळ व उभाट वाढ<br>• कमी अंतर ठेवून लावण्यास योग्य | • उंच, झाडांची सरळ व उभाट वाढ<br>• कमी अंतर ठेवून लावण्यास योग्य |
| *अपेक्षित उत्पन्न | १८ ते २० क्विंटल/ हेक्टरी | १८ ते २० क्विंटल/ हेक्टरी | १८ ते २० क्विंटल/ हेक्टरी |

**स्टेवर्डशिप गाईडन्स :**

**कपूस पीकांतील बाणसंबंधी सुचविलेल मार्गदर्शक तत्वे तसेच पीक व्यवस्थापनासंबंधी केंद्रीय तसेच राज्यातील संस्था यांनी प्रसारित केलेल्या मार्गदर्शक उपाययोजनांची अंबलबजावणी ही कापसातील बोलगार्ड २ या तंत्रज्ञानाच्या प्रभावी कार्यक्षमतेसाठी अतिशय महत्वाची आहे. उत्पादन तंत्रातील वाणासंबंधी सुचविलेल्या मार्गदर्शक उपययोजनांची वक्तशिर अंबलबजावणी न केल्यास बोलगार्ड २ हे कीड प्रतीकारक तंत्रज्ञान प्रभावी ठरत नाही. सद्य परिस्थितीत बोंड अळीचा वाढता प्रादुर्भाव तसेच शेंदरी बोंड अळी बोलगार्ड २ या तंत्रज्ञानाला दर्शवित असलेली प्रतिकार क्षमता ही वर उल्लेखित मार्गदर्शक उपाययोजनांची अंमलबजावणी न केल्यामुळे होत असुन तसेच आर्थिक नुकसानीच्या पातळीवर आधारीत पीक कीड नियंत्रणाच्या उपाययोजना वापरण्यासंबंधीच्या निर्वाणीचा ईशारा देत असुन कीड नियंत्रणासाठी हा ईशाराच अतिशय मोलाचा आहे. वरील उल्लेखिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन न केल्यामुळे होणा-या नुकसानीस ह्या तंत्रज्ञानाचा परवानाधारक जबाबदार राहणार नाही, तसेच वाणाच्या जनुकिय कार्यक्षमतेसही परवानाधारक जबाबदार राहणार नाही.**

*अपेक्षित उत्पन्न हे योग्य हवामान व कृषि विद्यापिठाने दिलेल्या माहितीचा अवलंबन केल्यास येते.
कृषि विद्यापिठ/ प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र/ कृषि विज्ञान केंद्र यांनी नमुद केलेल्या मशागतीच्या पद्धतीचा वापर करावा.
संदर्भीय श्रोतः कृषि विद्यापिठाचे दैनदीनीतुन.

kaveri seeds®

**कावेरी सीड कंपनी लिमिटेड**